| MHCO090007192025 | सादर तारीख – ३१/१०/२०२५<br>नोंदणी तारीख – ३१/१०/२०२५<br>निर्णय दिनांक – २४/०७/२०२६.<br>कालावधी–वर्ष ०० महिने ०८ दिवस २४ |
|---|---|

**कोल्हापूर येथील मे.न्यायाधीश, सहकार न्यायालय क्र.१, कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी श्रीमती ई. अ. भास्कर )**

.........................................................................................................................

**सहकारी वाद क्र. ६८३/२०२५** **निशाणी २९**

**तात्यासाहेब कोरे वाहनधारकांची ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. वारणानगर,** ... **वादी**
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
तर्फे श्री. हेमंत संपतराव विभुते.
व. व. ५०, धंदा: नोकरी,
रा. ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जि. सांगली.

**विरुध्द**

१. **श्री. विकास आनंदराव पाटील.** ... **प्रतिवादी**
व.व. ३१, धंदा – ऊस वाहतूक व शेती,
रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

२. **श्री. बाळासो शंकर पाटील (रोंगा).**
व.व. ६२, धंदा – शेती,
रा. साजणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

३. **श्री. मारुती केशव कारंडे.**
व. व. ५३, धंदा: ऊस वाहतूक,
रा. संभापूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

४. **श्री. मारुती नारायण मुळीक.**
व व. ५२, धंदा : शेती,
रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

५. **श्री. पंडीत शामराव पोवार.**
व. व. ५५, धंदा – ऊस वाहतूक,
रा. खोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**दावा रक्कम रु.६,८१,७७८/– वसुलीसाठी.**

........................................................................................................................

| | | |
|---|---|---|
| वादीचे वकील | – | ॲड. एन. आर. पाटील. |
| प्रतिवादी क्र. १ | – | स्वत: हजर. |
| प्रतिवादी क्र. २ ते ५ | – | एकतर्फा. |

........................................................................................................................

## – निकालपत्र –
## (घोषित दिनांक २४/०७/२०२६)

१. वादी संस्थेने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याकडून थकीत कर्ज रक्कम रु.६,८१,७७८/– व्याजासह वसुल होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे.

**वादी संस्थेचा दावा थोडक्यात खालीलप्रमाणे असा आहे,**

२. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, अंतर्गत नोंद झालेली सहकारी संस्था आहे, जीचा उद्देश सभासदांना कर्ज पुरवठा करणे, ठेवी स्वीकारणे, बँकीगच्या इतर सोयीसुविधा पुरवणे इ. आहे. प्रतिवादी हे वादी संस्थेचे "अ" वर्ग सभासद आहे.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना जामीन देऊन वादी संस्थेकडे रक्कम रु. ६,००,०००/– इतक्या कर्जाची ऊस तोडणी वाहतूक व्यवसायासाठी मागणी केली. त्या कर्ज मागणी अर्जाचा विचार करुन वादी संस्थेने त्यांच्या दि. २६/०८/२०२२ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ०५ नुसार कर्ज रक्कम रु. ६,००,०००/– इतक्या रक्कमेस मंजूरी दिली. प्रतिवादींनी संस्थेकडे दि. १६/०९/२०२२ रोजी कर्जरोखा, प्रॉमिसरी नोट इ. कागदपत्रे देऊन प्रत्यक्ष कर्जाची रक्कम रु. ६,००,०००/– उचल केली. सदर कर्ज हे द.सा.द.शे १५ टक्के व्याज दराने देण्यात आले होते. परंतू प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी घेतलेले कर्ज थकीत गेले, संस्थेच्या वारंवार विनंतीवरून व त्यांच्या वकीलांनी पाठविलेल्या नोटीसने कर्जाची मागणी केली परंतू प्रतिवादींनी कर्जाची रक्कम परत केली नाही त्यामुळे वादीने सदरचा दावा वसुलीकरीता दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र. १ हे स्वत: दावा कामी हजर झाले परंतू त्यांनी त्यांचे म्हणणे /कैफियत दाखल केले नाही म्हणून त्यांचेविरुध्द दावा विना कैफियत चालवण्याचा आदेश निशाणी १ वर करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र. २ ते ५ यांना दाव्याचे समन्स पाठवणेत आले. समन्सची प्रत्यक्ष बजावणी होऊनसुध्दा प्रतिवादी हे हजर न झालेने त्यांचेविरुध्द एकतर्फा हूकूम नि.१ वर करण्यात आला.

५. वादीची दाव्यातील कथने विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यांची उत्तरांसहित कारणमिमांसा खालीलप्रमाणेः

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी शाबीत करतो काय, प्रतिवादी क्र. १ ते ५ हे वादी संस्थेचे सभासद असून प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी संस्थेकडून रक्कम रू. ६,००,०००/– चे कर्ज घेतले असून त्या कर्जास प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे जामीनदार होते ? | **होकारार्थी.** |
| २. | वादी शाबीत करतो काय, सदर कर्ज थकीत असून थकीत कर्जापोटी वादी संस्था प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याकडून थकीत रक्कम रू. ६,८१,७७८/– वसुल करण्यास पात्र आहे ? | **अंशत: होकारार्थी.** |
| ३. | काय आदेश व हुकूमनामा ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

६. सदर कामी वादी त्याचा दावा शाबीत करण्याकरिता वादी संस्थेकडून श्री. हेमंत संपतराव विभुते यांच्या नि–१२ वरील व श्री. संजय रंगराव पाटील यांच्या नि. २६ वरील साक्षी पुराव्यावर भिस्त ठेवली आहे व खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली आहे.

१. संचालक मंडळ ठराव नि. १५,

२. कर्ज मागणी अर्ज नि. १६,

३. प्रॉमिसरी नोट नि. १७,

४. कर्जरोखा नि. १८,

५. प्रतिवादींना वकीलांमार्फत पाठवलेली नोटीस नि. १९,

६. पोहोच पावत्या नि. २० ते २४,

७. कर्ज खाते उतारा व प्रमाणपत्र नि. २५ व २७,

वादी संस्थेने नि. २८ वरील पुरसिसप्रमाणे त्यांचा पुरावा बंद केला. वादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. याउलट प्रतिवादी क्र. १ यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी वादी साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. तसेच त्यांचा पुरावा सदर कामी दाखल केला नाही व अंतिम युक्तीवाद केला नाही.

**मुद्दा क्रमांक १ व २ करिताः –**

७. मुद्दा क्र. १ व २ हे संलग्न असल्यामुळे ते एकत्रित चर्चीले जात आहेत. सदर कामी वादी संस्थेचा दावा शाबीत करण्याकरिता वादी संस्थेचे विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते ५ हे त्याचे संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या संस्थेकडून कर्ज रक्कम रू. ६,००,०००/– ही द. सा. द. शे. १५ टक्के व्याजदराने घेतले व त्यास प्रतिवादी क्र. ३ ते ५ जामीनदार होते. वादी संस्थेने वारंवार मागणी करून व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना कर्ज रक्कम अदा करण्याकरिता नोटीस पाठवूनही प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी कर्जाच्या रक्कमेचा भरणा वादी संस्थेत केला नाही. अंततः वादी संस्थेने त्यांचा दावा खर्चासह मंजूर करून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याकडून रक्कम रू. ६,८१,७७८/– रुपये ही द. सा. द. शे. १५ टक्के व्याजदराने दिनांक ०१/०५/२०२५ पासून वसूल होण्यास विनंती केली.

८. वादीच्या दाव्यात केलेल्या कथनांच्या व मागणीच्या अनुषंगाने पुराव्याचा विचार केले असता श्री. हेमंत संपतराव विभुते यांच्या साक्षी पुराव्या अन्वये दाव्यातील कथनांची पुनःवृत्ती

केली आहे. वादीच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की प्रतिवादी त्यांच्या संस्थेचे सभासद असून त्यांनी रक्कम रु. ६,००,०००/– चे कर्जाची मागणी केली. त्या अनुषंगाने पुराव्याचा विचार केला असता वादीने दाखल केलेली निशाणी १६ वरील कर्ज मागणी अर्जाचे अवलोकन केले असता प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद असल्याची बाब दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी संस्थेकडून रक्कम रु. ६,००,०००/– मागणी केली असून प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे त्यास जामीनदार असल्याची बाब स्पष्ट होत आहे.

९. वादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी संस्थेने प्रतिवादी यांच्या कर्ज मागणी अर्जाचे विनंती प्रमाणे दि. २६/०८/२०२२ रोजी रक्कम रु. ६,००,०००/– इतके कर्ज मंजूर करुन अदा केले. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने पुराव्याचा विचार केला असता वचनचिठ्ठी नि.१७, कर्जरोखा नि. १८, नि. २५ वरील खातेउताऱ्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ यांस दि. १६/०९/२०२२ रोजी र.रु. ६,००,०००/– दिल्याचे दिसून येते व त्याकरिता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वचनचिठ्ठी, करारनामा या सर्व कागदपत्रान्वये कर्ज घेऊन ते परतफेडण्याची हमी दिल्याचे दिसून येते. तसेच

१०. वादीचे विद्वान वकीलांनी पुढे युक्तीवाद केला की, प्रतिवादींकडे वारंवार मागणी करुनही कर्जाची परतफेड केली नाही. त्या अनुषंगाने पुराव्याचा विचार केला असता, निशाणी १९ वरील नोटीस व निशाणी २० ते २४ वरील पोहोच पावत्यांचे अवलोकन केले असता वादी संस्थेने प्रतिवादींकडे कर्जाची मागणी केल्याची बाब दिसून येत आहे. तसेच निशाणी २५ वरील खातेउताराचे अवलोकन केले असता दि. १३/०६/२०२५ अखेर रक्कम रु. ६,८१,२७८/– इतकी रक्कम प्रतिवादीने फेडली नसल्याचे दिसून येते. तसेच न्याय पटलावर प्रतिवादीनी सदरची रक्कम फेडली याबाबत कोणताही पुरावा नाही.

११. वादीच्या वकीलांनी त्यांना कर्ज फेडीची रक्कम द.सा.द.शे. १५ टक्केने मिळावी अशी

विनंती केली. त्या अनुषंगाने पुराव्याचा विचार केला असता वादीने दाखल केलेल्या निशाणी १७ वरील प्रॉमिसरी नोट नुसार प्रतिवादींनी ते द.सा.द.शे. १५ टक्कयांनी कर्जाची परतफेड करतील असे वादी संस्थेस वचन दिल्याचे व मान्य केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर कामी वादी संस्था ही प्रतिवादींकडून कर्जाची रक्कम द.सा.द.शे. १५ टक्के दराने वसुल करण्यास पात्र आहे.

१२. तसेच सदर कामी प्रतिवादीने वादी संस्थेचे साक्षीदारांचा उलटतपास घेऊन सदरच्या बाबी आव्हानीत केलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत वादीने सादर केलेल्या दाव्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण उद्भवत नाही. सबब सदर कामी प्रतिवादींनी सदरच्या पुराव्याला कोठेही आव्हानीत केले नाही त्यामुळे सदरचा साक्षी पुरावा व त्या अनुषंगाने शाबीत केलेले दस्ताऐवज र्निविवाद सिध्द झाले आहे.

१३. वर चर्चिलेप्रमाणे वादीच्या तोंडी व लेखी पुराव्यावरुन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी संस्थेकडून कर्ज घेतले व प्रतिवादी क्र. ३ ते ५ त्यांना जामिनदार होते. तसेच प्रतिवादींनी वादीकडून घेतलेले कर्जाची परतफेड केलेची नसलेबाबतची बाब सिद्ध केली आहे. त्यामुळे वादी हे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याकडून रक्कम रु. ६,८१,२७८/– व त्यावर द.सा.द.शे १५ टक्के दराने दि. १४/०६/२०२५ पासून परतफेडीची वैयक्तिक व संयुक्तिक जबाबदारी आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ करीता होकारार्थी व मुद्दा क्र. २ करीता अंशत: होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक ३ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा दावा अंशत: मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादी संस्थेची थकीत असलेले कर्ज रक्कम रु.६,८१,२७८/– अधिक सदर रकमेवर व्याज द.सा.द.शे. १५% प्रमाणे दिनांक १४/०६/२०२५ पासून ते रक्कम फिटेपर्यंत देण्यात यावी.

३. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी या दाव्याचा खर्चही वादीस देण्याचा आहे.

४. येणे प्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

ठिकाणी – कोल्हापूर.
दिनांक – २४/०७/२०२६.

सही/–
( श्रीमती ई. अ. भास्कर )
न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र.१, कोल्हापूर